# नगर परिषद कार्यालय वाडी
# जिल्हा नागपूर
## ई-निविदा सुचना-१

सुचित करण्यात येते की, नगर परिषद वाडी कार्यालयाला कार्यालयीन कामकाजा करीता स्टेशनरी तथा प्रिंटींग साहीत्य पुरवठा करावयाचा आहे. करीता इच्छुक कंत्राटदार/संस्था/एजेन्सी यांच्याकडून सदर कामाकरीता खालील विवरणाच्या निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. सदर कामाच्या निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने निविदेच्या विस्तृत नमुना व खरेदी करावयाचा साहीत्याचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. 15 / 05 /२०२६ सायंकाळी ०६.०० वाजता पासुन पहावयास उपलब्ध आहे.

( नरेश चरडे )
अध्यक्ष
नगर परिषद वाडी

(डॉ. ऋचा धाबर्डे)
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी

# नगर परिषद कार्यालय वाडी
# जिल्हा नागपूर
## ई-निविदा सुचना-१

सुचित करण्यात येते की, नगर परिषद वाडी कार्यालयाला कार्यालयीन कामकाजा करीता स्टेशनरी तथा प्रिंटींग साहीत्य पुरवठा करावयाचा आहे. करीता इच्छुक कंत्राटदार/संस्था/एजेन्सी यांच्याकडून सदर कामाकरीता खालील विवरणाच्या निविदा आमंत्रित करण्यात येत आहे. सदर कामाच्या निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने निविदेच्या विस्तृत नमुना व खरेदी करावयाचा साहीत्याचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. 15 / 05 /२०२६ सायंकाळी ०६.०० वाजता पासुन पहावयास उपलब्ध आहे.

**निविदा अनामत रक्कम :- २०००/-**

**निविदा प्रसिद्धीचा तपशिल**

| | |
|---|---|
| ई निविदा प्रसिद्धी | दि. 15 / 05 /२०२६ सायंकाळी 6:00 पासून |
| ई निविदा दस्ताऐवज डाऊनलोड | दि. 15 / 05 /२०२६ सायंकाळी 6:00 पासून ते<br>दि. 30 / 05 /२०२६ ला दुपारी 5:00 वाजेपर्यंत |
| दाखल करण्याची दि. | दि. 30 / 05 /२०२६ दुपारी 5:00 वाजेपर्यंत |
| तांत्रिक बोलीचा लिफाफा उघडण्याचा दि. | दि. 01 / 06 /२०२६ ला दुपारी 3:00 वाजता किंवा न.प. च्या सोयीनुसार |

( नरेश चरडे )
**अध्यक्ष**
**नगर परिषद वाडी**

(डॉ. ऋचा धाबर्डे)
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वाडी**

**साहीत्य खरेदीच्या अटी व शर्ती:**

1) निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. निविदेची पुढील मर्व कार्यवाही व शुध्दीपत्रके वरील महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध राहतील.

2) निविदा फी, अनामत ऑनलाईन भरणा करणे आवश्यक आहे. या निविदा संबंधीचे दस्ताऐवज स्कॅन केलेल्या स्वरुपात विहित मुदतीत ई-निविदासोबत सादर करणे बंधनकारक राहील. अपलोड केलेल्या दस्ताऐवजाची एक प्रमाणीत प्रत निविदा मंजूर झाल्यास नगरपालिकेत जमा करावी लागेल.

3) निविदा धारकाने आपले फोटो, परीचयपत्र नमुना स्वाक्षरी मोबाईल / दुरध्वनी क्रमांक निविदेसोबत नमुद करणे बंधनकारक आहे.

4) निविदा दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत, लिफाफा क. १ मध्ये दुकानाचे नोंदणी (Shop Act), जीएसटी (GST Registration) व मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र (Income Tax Return), हितसंबंध नसल्याचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-अ मध्ये) इत्यादी सत्यप्रत असने आवश्यक आहे. यापैकी कोणतेही दस्ताऐवज नसल्याने निविदा स्विकृत करण्यात येणार नाही.

5) निविदा शुल्क भरणे बंधनकारक आहे. अन्यथा निविदा नाकारण्यात येईल.

6) मंजुर निविदा नुसार ५०० रूपयाच्या स्टॅपपेपरवर करारनामा करून द्यावा लागेल. तसेच पुरवठा आदेश दिल्यापासून दिलेल्या विहीत मुदतीचे आंत पुरवठा करणे बंधनकारक राहील.

7) साहीत्य आवश्यकतेनुसार वेळोवेळी साहीत्य आदेशात नमुद विभागावर पोहचता करावी लागेल.

8) कामाचा आदेश दिल्यापासून १० दिवसात साहित्य पुरवठा न केल्यास मुदतीच्या अखेरच्या दिवसापासून १०० रू. प्रती दिवस दंड आकारणी करण्यात येईल व या मुदतीमध्येही साहित्य पुरवठा न झाल्यास आपले काम आहे त्या स्थितीत रद्द करून दुसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदाराकडून खरेदी करण्यात येईल व होणाऱ्या नुकसानीस निविदा धारक स्वतः जबाबदार असेल.

9) सर्व साहीत्य निविदा यादीत दर्शविल्याप्रमाणे तंतोतंत असावे. याची खात्री व समाधान झाल्याशिवाय देयक देण्यात येणार नाही. एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार नगर पालिकेकडे सुरक्षीत राहील. वरील काम करीत असतांना कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यावर अंतिम निर्णय देण्याचा अधिकार नगर परिषदेला राहील व तो दोन्ही पक्षास मान्य राहील.

10) मागविण्यात आलेले साहित्य कार्यालयापर्यंत पोहचविण्याचे जबाबदारी निविदाधार्काची असेल. त्यासाठी कोणत्याही वाहतूक खर्च अनुज्ञेय असणार नाही.

11) वरील काम करीत असतांना कामाच्या स्वरूपात बदल होत असल्यास / बदल करण्याची आवश्यकता भासल्यास मुख्याधिकाःयाची परवानगी घेवूनच बदल करता येईल,

12) शासनाच्या नियमाप्रमाणे भरावयाचे कर देयकातून कपात करण्यात येईल. निधीच्या उपलब्धतेनुसार
देयक अदा करण्यात येईल.

13) मंजूर निविदातील कोणत्याही साहीत्य दरावर पुरवठाधारकास जीएसटी तथा अधिकचा कोणताही वेगळा कर दिल्या जाणार नाही. हे सर्व कर निविदेतील नमुद दरात समाविष्ट असेल,

14) सदर निविदा सन २०२६-२७ या आर्थीक वर्षाकरीता असल्याने मंजुर दराप्रमाणे वर्षभर आवश्यकतेनुसार व वेळोवेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे पुरवठा करावा लागेल.

15) इतर अटी व शर्ती तथा साहीत्य यादी व नमुने याबाबत माहीती कार्यालयीन वेळेत समंधीत विभागाकडे
पहावयास मिळेल.

अध्यक्ष
नगर परिषद, वाडी

Signature Not Verified
Digitally signed by RUCHA GIRISH BHALEKAR
Date: 2026.05.14 17:39:36 IST
Location: Maharashtra-MH

(रुचा भालेकर)
मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी